# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १० वा ❑ गुरूवार दि.०६ फेब्रुवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### 'असर' ने शिक्षणातील काढली 'कसर'

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

शिक्षणाचा संख्यात्मक दर्जा वाढला असला तरी गुणात्मक दर्जा मात्र घसरला आहे हे पुन्हा एकदा असरने केलेल्या सर्वेक्षणातून पुढे आले आहे. शालेय शिक्षण विभाग शिक्षणावर करोडो रुपये खर्च करत असते मात्र शिक्षणाचा स्तर वाढण्याऐवजी घटत चालला असल्याचे वास्तव समोर आले आहे.

देशभरातील ग्रामीण शिक्षणाचे वास्तव मांडणारा ॲन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट म्हणजे असर चा १४वा अहवाल मंगळवारी जाहीर झाला असून या अहवालातून राज्यातील ग्रामीण भागातील शिक्षणाची स्थितीही समोर आली आहे. राज्यातील ३३ ग्रामीण जिल्ह्यांतील ९८७ गावांतील १९ हजार ५७३ घरांमधील ३३ हजार ७४६ मुलांचे सर्वेक्षण करण्यात आले. ३ ते १६ वर्षे वयोगटातील मुलांच्या पटनोंदणीची स्थिती आणि ५ ते १६ वर्षे वयोगटातील मुलांच्या मूलभूत वाचन आणि गणित कौशल्यांवरील सांख्यिकीय माहिती शाळा तसेच १४ ते १६ वर्षे वयोगटातील मोठ्या मुलांना त्यांच्याकडे असलेली डिजिटल उपलब्धता आणि वापराबद्दल प्रश्न विचारले गेले आणि त्यांच्या डिजिटल क्षमतांचे मूल्यांकन करण्यासाठी स्मार्टफोन-आधारित प्रश्नदेखील त्यांना विचारत हा अहवाल केला असल्याचे असरने म्हटले आहे. २०२२ च्या तुलनेत ही स्थिती सुधारली असली, तरी अद्यापही गणित आणि वाचन कौशल्याचा अभाव दिसत आहे. पटनोंदणीचे प्रमाण स्थिर असले, तरी इयत्ता आठवीत पटावरून बाहेर जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २०२२ च्या तुलनेत ०.५ टक्यांनी वाढली आहे.

इयत्ता आठवीमधील मुले जी भागाकाराचे गणित सोडवू शकतात अशा मुलांचे प्रमाण २०२२ मध्ये ३४.६% वरून २०२४ मध्ये ३६.३% इतके आहे. इयत्ता ८ वीची शासकीय शाळेत जाणारी ३४.५ टक्के मुले भागाकाराची गणिते करू शकली तर खासगी शाळेतील मुलांचे हे प्रमाण ३७.१ टक्के आहे. म्हणजेच इयत्ता ८ वी तील खासगी शाळेतील मुले सरकारी शाळेतील मुलांपेक्षा भागाकारात चांगली कामगिरी करत असल्याचे दिसते.

राज्यातील शालेय विद्यार्थ्यांमधील गुणवत्तेमध्ये अनेक प्रयत्नांनंतरही अद्याप सुधारणा झाली नसल्याचे 'प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन'ने केलेल्या 'ॲन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन' (असर) सर्वेक्षणामध्ये स्पष्ट झाले आहे. यानुसार सुमारे २५ टक्के विद्यार्थांना (इयत्ता दुसरीचे) मराठी वाचता आले नाही तर ६४ टक्के विद्यार्थ्यांना तीन अंकी संख्येला एका अंकी संख्येने भागता आले नाही.

पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी अवगत केलेल्या भाषिक आणि गणिती कौशल्यांची पाहणी 'असर' सर्वेक्षणात करण्यात आली आहे. वयानुसार आवश्यक वाचन कौशल्ये आत्मसात केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण म्हणजेच दुसरीच्या दर्जाचे वाचता येणाऱ्या दुसरीतील विद्यार्थ्यांचे प्रमाण केवळ १७.५ टक्के आहे. आठवीच्या २५.८ टक्के विद्यार्थ्यांना दुसरीच्या स्तराचा मराठीतील परिच्छेद वाचता आला नाही. आठवीतील ६.३ टक्के विद्यार्थ्यांना केवळ सोपे शब्द वाचता आले, मात्र सोपी वाक्ये वाचता आली नाहीत. ३.६ टक्के विद्यार्थ्यांना अक्षरे ओळखता आली पण शब्द वाचता आले नाहीत तर १.७ टक्के विद्यार्थ्यांना अक्षरओळखही नसल्याचे विदारक चित्र यंदा पुन्हा दिसले आहे.

अक्षर ओळख या निकषावर इयत्ता पहिलीतल्या २६ टक्के विद्यार्थ्यांना एकही अक्षर ओळखता आले नाही, तर इयत्ता आठवीतील १ टक्के विद्यार्थी एकही अक्षर ओळखू शकले नाही, तर साडेसहा टक्के विद्यार्थ्यांना शब्दांची ओळख असली, तरी पहिल्या किंवा दुसऱ्या इयत्तेच्या पातळीचे उतारेही त्यांना वाचता आले नाहीत. १४ टक्के विद्यार्थी जेमतेम पहिल्या इयत्तेपर्यंतचा उतारा वाचू शकले, तर ७४.२ टक्के विद्यार्थ्यांना दुसऱ्या इयत्तेचा उतारा वाचता आला. आकडेमोडीच्या बाबतीत आधीच्या वर्षांच्या तुलनेत थोडी प्रगती झाली असली, तरी इयत्ता आठवीतील ३४ टक्के विद्यार्थ्यांना ९९ पर्यंतचे आकडे येत असले, तरी वजाबाकी किंवा भागाकार ही आकडेमोड करणे शक्य झाले नसल्याचे अहवालात म्हटले आहे. १४ ते १६ वयोगटातील ९४ टक्के विद्यार्थ्यांच्या घरी स्मार्टफोन आहेत. त्यापैकी ७० टक्के विद्यार्थी ते स्मार्टफोन चाचणीसाठी आणू शकले. १९ टक्के विद्यार्थ्यांकडे स्वतःचा स्मार्टफोन आहे. यापैकी ६३ टक्के विद्यार्थी शैक्षणिक कामांसाठी स्मार्टफोन वापरतात, तर ७२ टक्के विद्यार्थी सोशल मीडियावर सक्रिय राहण्यासाठी स्मार्टफोन वापतात असे दिसून आले.

असर च्या सर्वेक्षणात देशातील यात ३० राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील ग्रामीण भागांतील ५२ हजार २२७ घरांचा समावेश होता. ज्यात विद्यार्थी शैक्षणिक प्रवाह, शाखा कोणती निवडतात हे पाहण्यात आले होते. मात्र कौशल्य विकास अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांची पसंती नसल्याचेच सर्वेक्षणात उघड झाले आहे.

असर च्या सर्वेक्षणात २५ टक्के विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रादेशिक भाषेतील दुसरीच्या पुस्तकातील परिच्छेद वाचता आला नाही. तर निम्म्याहून अधिकांना सामान्य प्रश्न सोडवण्यात जमले नाहीत असा धक्कादायक निष्कर्ष आला आहे.

# डॉ.सुधीर रसाळ यांचा सत्कार संपन्न










**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांच्या 'विंदांचे गद्यरूप' या समीक्षा ग्रंथाला साहित्य अकादमीचा पुरस्कार नुकताच मिळाला, त्यानिमित्त ज्योतिर्मय या नव्यानेच सुरु झालेल्या फक्त साहित्यावर आधारित दैनिकाचे संपादक संजय व्यापारी यांनी त्यांचा सत्कार केला व त्यांच्या दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. फक्त साहित्याकरिता तुम्ही हे दैनिक सुरु करता म्हणजे तुम्ही फार मोठे धाडस करीत आहात, कारण हे काम खूप अवघड आहे पण तुम्ही यात नक्कीच यशस्वी व्हाल असे माझे आशीर्वाद मी देतो, यनिमित्ताने तुम्ही नव साहित्यिकांना एक छान व्यासपीठ मिळवून दिले त्यांचे नक्कीच साहित्य विद्यापीठ होईल असे डॉ सुधीर रसाळ यांनी सांगितले.

डॉ रसाळ यांचे मराठी साहित्य विश्वातील अमूल्य योगदान आहे. मराठी भाषेचे अध्यापन, संशोधन, संपादन आणि समीक्षा असा त्यांचा चौफेर विहार राहिला आहे. विशेषतः त्यांचे मराठी काव्यविषयक संशोधनात्मक लेखन मौलिक असे आहे. समीक्षेतून कठीण विषय सहज-सुलभपणे समजावून देणारी त्यांची शैली नवोदितांना आश्वासक वाटते, यातच त्यांचे मोठेपण आहे.

मराठी भाषा जतन, संवर्धन तसेच साहित्य विषयक चळवळीतील संस्था, समित्यांवरही डॉ. रसाळ सक्रीयपणे कार्यरत आहेत. त्यांच्या समीक्षात्मक लेखनाला राष्ट्रीयस्तरावर मिळालेली ही दाद नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. डॉ. रसाळ आजही तितक्याच तडफेने लेखन, संशोधनात कार्यरत आहेत. त्यांच्या हातून यापुढेही मराठी साहित्याची अशीच अखंडित सेवा घडत राहो. यावेळी प्रसिद्ध साहित्यिका श्रीमती मंगला वैष्णव या पण उपस्थित होत्या त्यांचाही सत्कार या निमित्ताने करण्यात आला.

# भाषातज्ञ अशोक राणा १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक २१, २२ आणि २३ फेब्रुवारी रोजी आयोजित १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्य व संस्कृतीचे अभ्यासक, इतिहास संशोधक व भाषातज्ञ डॉ. अशोक राणा (यवतमाळ) यांची निवड आज विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या अध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी यांनी पत्रकार परिषदेत घोषित केली. डॉ. अशोक राणा हे १८ व्या विद्रोही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ग्रामीण साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे यांच्याकडून सूत्रे हाती घेतील. या वेळी विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे पदाधिकारी किशोर ढमाले व विद्रोही १९ वे विद्रोही साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष इंजि. सतिश चकोर, निमंत्रक धनंजय बोरडे हे उपस्थित होते.

विद्रोही सांस्कृतिक चळवळ १९९९ पासून महाराष्ट्रभर कार्यरत आहे. महात्मा जोतिराव फुले यांनी ग्रंथकार सभेस पाठविलेले पत्र हा विद्रोहीचा वैचारिक जाहीरनामा आहे. न्या.म.गो. रानडेंनी ग्रंथकार सभेत सहभागी होण्याचे निमंत्रण म. जोतीराव फुले यांना दिले; तेव्हा ''तुमच्या ग्रंथांमध्ये अखिल मानवाचे हित होईल याचे बीज नाही.'' असे म्हणत म. फुलेंनी ''उंटावरून शेळ्या वळणार्या घालमोड्या दादाच्या'' त्या संमेलनात सहभागी होण्यास ठाम नकार दिला होता. आमचे ग्रंथकार तयार होतील, तेव्हा ते स्वाभिमानाने आपली संमेलने भरवतील असेही म्हटले होते. ग्रंथकार सभेचे २० व्या शतकातील स्वरूप म्हणजे अ.भा. मराठी साहित्य संमेलन आहे. अ. भा. साहित्य संमेलन आणि महामंडळ यांचा आजवरचा व्यवहार हा विषमतावादी राहिला आहे. चिपळूणच्या साहित्य संमेलनात परशुरामाची मूर्ती स्टेजवर ठेवण्याचा आग्रह, ठाण्यात संमेलन स्मरणिकेत महात्मा यांच्या खुन्याचा पंडित नथुराम असा उल्लेख करणे असेल. संयुक्त महाराष्ट्राचे सेनानी शाहीर अण्णाभाऊ



साठे, शा. गव्हाणकर, शा. अमर शेख, शा. वामनदादा कर्डक,शा. यशवंत चकोर, क्रांतीसिंह नाना पाटील, भाई उद्धवराव पाटील, कर्मवीर दादासाहेब गायकवाड, यांना संमेलनासाठी साधे निमंत्रणही न देणे; उलट अनेक दांभिकांना अध्यक्षपदे बहाल करणे, स्वातंत्र सैनिक व थोर गांधीवादी नयनतारा सहेगल यांना यवतमाळला उद्घाटक म्हणून बोलावून नंतर अपमानित करणे, संविधान जाळण्याचे समर्थन करणारांना प्रतिष्ठा देणे अशी अ.भा. मराठी साहित्य संमेलनाच्या विषमतावादाची असंख्य उदाहरणे आहेत. किंबहुना विषमतावादी सांस्कृतिक राजकारणाचे ते मूखंडच आहे. म्हणूनच ब्राह्मणी, भांडवली, पुरुषत्ताक मूल्य आणि विषमतावादी सांस्कृतिक विचारांचा विषारी प्रचार-प्रसार करणार्या संस्था, संघटना व संमेलनाच्या विरोधात भूमिका घेण्याचा फुले-आंबेडकरांचा संदेश मानून आपण विचार व संघटित कृती केली पाहिजे.

विद्रोही सांस्कृतिक चळवळ जीवनाच्या सर्व क्षेत्रात समतावादी संस्कृती व साहित्य विचारांचा पुरस्कार करते. विद्रोही साहित्य चळवळीच्या वतीने आजवर मुंबई, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, सोलापूर, नंदुरबार, वाशी (नवी मुंबई), पुणे, मनमाड, धुळे, परभणी, बुलढाणा, हिंगोली, नाशिक, उदगीर, वर्धा, अमळनेर इत्यादी ठिकाणी साहित्य संमेलने, एक आंतरराज्य (निपाणी), एक विद्रोही महिला साहित्य संमेलन (पुणे) यशस्वीपणे आयोजित करण्यात आली आहे. कालकथित बाबुराव बागुल, कवी वाहरू सोनवणे, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. अजिज नदाफ, आत्माराम कनिराम राठोड, कॉ. तारा रेड्डी, तुळसी परब, डॉ. आ. ह. साळुंखे, संजय पवार, जयंत पवार, उर्मिला पवार, डॉ. श्रीराम गुंदेकर, डॉ. प्रतिभा अहिरे. विमल मोरे, डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. आनंद पाटील, गणेश विसपुते, चंद्रकांत वानखेडे, डॉ. वासुदेव मुलाटे यांसारख्या सर्जनशील साहित्यिकांनी विद्रोही साहित्य संमेलनाची अध्यक्षपदे भूषविली आहेत.

डॉ. अशोक राणा हे मराठी साहित्य, भाषा, इतिहास, लोकसंस्कृती, प्रबोधन, संत वाङ्मय, आधुनिक समीक्षा, चित्रकला, नाट्य अशा विविध विषयांमध्ये पारंगत संशोधक म्हणून ख्यातनाम आहेत. त्यांची संशोधन व प्रबोधनपर ७६ पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांनी ''विलास सारंग यांच्या कथांवरील अतिवास्तववादी छाया'' तसेच ''मराठी कथा व कवितांमधील नाग मिथक व प्रतिमा'' अशा आधुनिक व प्राचीन विषयांवरील अभ्यासापासून तरूण वयात संशोधनाला सुरूवात केली. त्यांनी भाषा व साहित्य या विषयात 'साहित्याची भाषा', साहित्य निर्मिती प्रक्रिया', 'मराठीच्या मानगुटीवर संस्कृतची वेलांटी', 'बहुजन साहित्य म्हणजे काय?', 'साहित्याची जात्यांधांची झुंडशाही', इत्यादी ५, प्राचीन इतिहास- मिथके- पुरातत्व- सण-उत्सव अशा लोकसंस्कृती संदर्भातील 'सिंधू जणांनी निऋती', 'शोध सरस्वतीचा', 'गणेश जन्माच्या कथेचा अर्थ', 'देवादिकांचे रहस्य', 'नागकथा व भूतपिशाच्च', 'कृषि विरूद्ध ऋषी', 'बौद्ध गणपती व सरस्वती', 'आदिमाया', 'सणांची सत्यकथा', 'मिथक साहित्य व संस्कृता' इत्यादी२३, प्रबोधनपर 'गाडगे बाबा, बाबासाहेब व भाऊसाहेब', 'डॉ. आंबेडकर व मातृदेवता', 'बुद्ध व बुद्धिप्रामाण्यवाद', 'वैज्ञानिक दृष्टिकोन व जादूटोणा', 'समरसतेचे वारकरी', 'मनुस्मृती-संघ व संविधान', 'राष्ट्रसंत तुकडोजी विचार इत्यादी १३, संत वाङ्मयासंदर्भातील 'वेदोक्त प्रकरण व संत साहित्य', 'रामदासी परंपरा व संत तुकाराम', 'सार्वकालिक संत तुकाराम', 'विठोबा कोणाचा?' इत्यादी ५, जिजाऊ, शिवकाल, छत्रपती संभाजी, आहिल्यामाई या मध्य युगाच्या अंतिम चरणातील इतिहासाबद्दल : 'आरोपीच्या पिंजर्यात संभाजी', 'शिवशाहीचा उदय', 'शिवरायांचा प्रताप', 'शिवचरित्राची शिकवण', 'शिवाजी शूद्र कसे?', 'शिवराज्याभिषेक १ ला व २ रा' अशी ११ पुस्तके, धर्म-ब्राह्मणी धर्म, शिवधर्म या संदर्भात 'शिवधर्म चिंतन', 'शिवधर्माची प्राथमिक संहिता', 'ब्राह्मणी धर्म व शिवधर्म इत्यादी ५, आणि संशोधन पद्धती इत्यादी संदर्भात 'इतिहास संशोधन क्लासिकल व मासिकल', 'इतिहासाचे विकृतीकरण', 'असत्याची सत्य कथा', 'डॉ. आ.ह. साळुंखे- साहित्य व विचार इत्यादी ३, अशी एकूण ७६ पुस्तके डॉ. अशोक राणा यांनी लिहिलेली आहेत.

पाश्चात्य व आफ्रीकी मातृदेवता, भगवत गीतेतील चार्वाक, 'सरस्वतीची सत्यकथा', 'कॉ. शरद पाटील यांची मिथक चिकित्सा', 'बसवेश्वरांचा देव' इत्यादी विषयांसंदर्भातील २६ पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. साप्ताहिक चित्रलेखा (संपादक-ज्ञानेश महाराव) मधील 'असत्याची सत्य कथा' आणि मातृपूजन विश्वभजन या डॉ. अशोक राणा यांच्या लेखमाला विशेष गाजल्या. 'रूजलेल्या व लादलेल्या मिथकांनी विकृत वळण घेऊन इतिहासाचा ताबा घेऊ नये याची संयतपणे काळजी घेत मिथकांमागील अर्थ-अन्वयार्थ स्पष्ट करण्याचा निरंतर प्रयत्न डॉ. अशोक राणा करत आहे. सत्याची कास धरत ते 'भूतभाषा पैशाची' संदर्भात लिहितात, नागभाषेचा मागोवा घेत ते कॉ. शरद पाटलांच्या संशोधक पाऊलवाटेने स्त्रीराज्याची आद्य राणी गणमाता निऋती पर्यंत पोहोचतात. छत्रपती संभाजी महाराजांवरील ब्राह्मणी छावणीने घेतलेल्या आक्षेपांचा सामना ते करतात. गाडगे बाबा व तुकडोजी महाराज यांच्या प्रबोधनाचा पुनरूच्चार करतात. बुद्ध, तुकाराम, महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांचा सांगावा सांगतात. इतिहासाला व संशोधनाला सत्याच्या पायावर उभे राहत या मातीशी व माणसांशी जोडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारा साहित्यिक व अभ्यासक म्हणून मराठी बहुजन जनता डॉ. अशोक राणा यांना ओळखते. वारकरी सार्वकालिक तुकारामांचा परिचय करून देणार्या डॉ. अशोक राणा यांनी शिवधर्म मांडणी व उभारणीत मोलाचा वाटा उचलला आहे. आजच्या विद्वेषाच्या कालखंडात संविधानिक लोकशाहीवर हल्ला होत असताना माणूसकीचा इतिहास, वारसा व त्याची पुर्नमांडणी करणार्या डॉ. अशोक राणा यांची १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करताना आम्हाला आनंद होत असल्याचे प्रा. प्रतिमा परदेशी यांनी सांगितले.

## लक्षवेधी छायाचित्र....




बघा... बघा चतुर ड्रॅगनफ्लाय (हेड)

(छाया : संजय दारमावर, मुंबई)



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



## आनंदी पहाट...

### अंतरात्म्याला शांती मिळणे अत्यंत जरुरीचे

ज्योतिर्मय साहित्य

सुखाचा संबंध अनेकदा शरीराशी जोडला जात असतो. सुखद अनुभवांची आश्वासकता ही मनाला देखील जरुरीची असतेच. परंतू शारीरिक पातळीवर सुखी होण्याची केविलवाणी धडपड आपण दिवसरात्र करत असतो. आपल्या प्रत्येक विचार, वर्तन आणि व्यवहारांत आपण सुख मिळवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असतो. आपल्याला अपेक्षित सुख मिळेपर्यंत आपली धडपड सुरुच असते. मिळेल त्यांत समाधानी राहावे असे म्हंटले जाते, पटते का आपल्याला? जे काही मिळते त्यांत आपण खरेच समाधानी राहू शकतो का?

समाधानाचा संबंध थेट आपल्या अंतर्मनाशी असतो. त्यामुळे आपल्या अंतर्मनाला जोपर्यंत समाधान मिळत नाही, तो पर्यंत आपण मानसिक पातळीवर स्वास्थ्य मिळवू शकत नसतो. आपण करत असलेल्या सर्वच गोष्टी आपल्याला नेहमीच समाधान मिळवून देतातच असे नाही. आपण करत असलेल्या गोष्टींमध्येच आपण समाधान शोधत असतो. परंतू ज्या गोष्टी आपल्याला समाधान देतील त्यांची आपण निवड करतो का? अंतरात्म्याला शांती मिळणे अत्यंत जरुरीचे असते. आपल्या दैनंदिन गरजा भागवताना आपण केवळ शरीराचाच विचार करत असतो. अन्न, वस्त्र, निवारा ह्या तीनही गरजा आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. आपल्याला त्याव्यतिरिक्त आणखीन एका गोष्टीची गरज असते, ती म्हणजे शांतीची. आपल्या अंतर्मनाला, अंतरात्म्याला शांती मिळणे मानसिक स्वास्थ्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आपल्या दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याच्या धावपळीत आपण आपली मुलभूत गरजच विसरून जातो, त्याची जाणीवच आपल्याला होत नाही. आपल्या जीवनांतील सार कशांत आहे? हे आपण स्वतःच शोधून काढायचे असते. त्याच्यासाठी आपल्या अंतरात्म्याचा शोध घेण्याची, त्याला समजून घेण्याची, त्याचा यथायोग्य विचार करण्याची जरुरी असल्याची आपल्याला जाणीव असलीच पाहिजे.

## श्रीपाद वल्लभ दिगंबरा...

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

सुमतीनं भानावर येत पुन्हा त्यांच्याकडं पाहिलं तर काय आश्चर्य ! तो मघाचाच तेज:पुंज अतिथी तिच्या नजरेस पडला. डोळ्यातून अश्रू पाझरू लागले. ती म्हणाली, महाराज, आपण मला आई म्हणालात, मी धन्य झाले. आता एकच इच्छा आहे. आपल्यासारखाच ज्ञानी, तेजस्वी पुत्र मला व्हावा.


तथास्तु ! माते, तुझी इच्छा नक्कीच पूर्ण होईल. तुला एक ज्ञानी आणि तेजस्वी असा पुत्र होईल. त्याची ख्याती सर्वत्र पसरेल, तुमच्या कुळाचा उद्धार होईल आणि तुमचे सगळे दुःख, दैन्य तो दूर करील. पण... अतिथिदेव म्हणाले. पण काय महाराज.. ?



माते, हा पुत्र जगदवंद्य होईल. पण तो तुमच्याजवळ फार काळ राहणार नाही. तुम्हीही त्याचे ऐका. त्याच्या मनाविरुद्ध वागू नका. अतिथिदेव म्हणाले.

जशी आपली आज्ञा महाराज, सुमती म्हणाली. तिने वर पाहिले तो अतिथी अदृश्य झाला होता.


यतिवरांच्या रूपाने साक्षात दत्तगुरु दारी आले होते. सुमती मनोमन सुखावली. आपलराज बाहेरून येताच त्यांच्या कानावर तिने ही शुभवार्ता घातली. त्यांनाही खूप आनंद झाला. यथावकाश सुमतीला पुन्हा दिवस राहिले. तिच्या चेहऱ्यावर एक विलक्षण तेज दिसू लागले. एका नव्या जाणिवेनं ती मोहरून गेली. भाद्रपद शुद्ध चतुर्थी. गणेश चतुर्थीचा दिवस. इ. स. १३२०. या शुभ मुहूर्तावर सुमतीने एका सुस्वरूप, सुलक्षणी बाळाला जन्म दिला. बाळाची




पत्रिका पाहून विद्वान ज्योतिषांनी भाकीत वर्तवले, हा मुलगा मोठेपणी अत्यंत ज्ञानी आणि विद्वान होईल. अनेक लोकांचा उद्धार याच्या हातून होईल. अनेक लोकांना तो गुरुस्थानी असेल आणि त्याच्या शिकवणुकीचे पालन करणारा मोठा शिष्यवर्ग तयार होईल. श्री दत्तगुरूंच्या कृपाप्रसादाने झाला म्हणून या बाळाचे नाव श्रीपाद ठेवण्यात आले.

श्रीपाद आपल्या बाललीलांनी सर्वांचे मन मोहून टाकत असे. त्याच्या गोड मुखाकडे पाहून सुमती आणि आपलराज आपले सारे कष्ट आणि दुःख विसरून जात. श्रीपाद आठ वर्षांचा झाला. आपलराज आणि सुमतीने त्याचा व्रतबंध करायचं ठरवलं. दारी मंडप उभा राहिला. सनई चौघड्याचे सूर घुमू लागले. आपलराजाने श्रीपादच्या कानात गायत्री मंत्र सांगितला. आणि एक आश्चर्य घडले. त्या आठ वर्षाच्या बालकाच्या मुखातून सुस्पष्ट अशी वेदवाणी बाहेर पडू लागली. सगळ्यांनाच त्याचे आश्चर्य वाटले.

लवकरच श्रीपाद चारी वेद, शास्त्र यात पारंगत झाला. त्याची कुशाग्र बुद्धी, तीव्र निरीक्षणशक्ती पाहून विद्वानांनी तोंडात बोटे घातली. सर्वांना आनंद देणारा हा श्रीपाद लवकरच सोळा वर्षांचा झाला. आता त्याच्या मातापित्यांना त्याच्या लग्नाची स्वप्ने पडू लागली होती. सून घरात येईल म्हणून ते आनंदले होते. एकदा आईने हा विषय काढताच श्रीपाद म्हणाला, आई, माझ्या लग्नाचे स्वप्न तू पाहू नकोस. मी लग्न करणार नाही. माझे लग्न वैराग्य नावाच्या स्त्रीबरोबर झाले आहे. मी संन्यस्त राहणार, मला हे घरही सोडावं लागणार आहे. पाय नेतील तिकडे मी जाणार आहे. करतली भोजन आणि तरुतली निवास करणार. माझे जीवितकार्य दुसरे आहे. **(क्रमशः)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

### परमार्थ स्तवन

ज्योतिर्मय साहित्य

समास नववा

परमार्थ हा खुपच अध्यात्मवादी शब्द आहे. समर्थ जेव्हां दासबोध लिहित असतील तेव्हा त्यांनी किती विचार पूर्वक ह्या शब्दाची फोड केली हे दिसुन येते.

१)परम---सर्वश्रेष्ठ

२)अर्थ---म्हणजे ज्ञेयवस्तु


परमार्थ या शब्दात श्री कालाचे ज्ञान. सामावले आहे. ते कसे हे सांगण्याचा अल्पसा प्रयत्न करते आहे.

ब्रम्ह,ब्रम्हज्ञान,ब्रम्हज्ञान साधना या तिन्ही साठी ऐकच शब्द समर्थ वापरतात. आत्मज्ञानी व सिध्द पुरूषांच्या मते,आत्मज्ञानी व सिध्दपुरूषाच्या विचाराने पाहिले तर ब्रम्ह किंवा आत्मा सर्वश्रेष्ठ आहे. ब्रम्हवस्तु प्राप्त करून घेणे हे माणसाचे सर्वश्रेष्ठ ध्येय आहे ते ध्येय गाठण्यासाठी जी साधना करावी लागते त्याला ''परमार्थ'' असे म्हणतात.

परमार्थ म्हणजे ईश्वराचा शोध होय.परम म्हणजे अखेरचे अद्वितीय आणि अर्थ म्हणजे कारण,हेतु,मुळ असा अर्थ निघु शकतो. हे विश्व घटनामय आहे. अनंत घटनांचा सागर आहे. घटना अनुभवली की तिचे मुळ किंवा कारण तिचा हेतु शोधल्या वाचुन मानवी बुध्दीला चैन पडत नाही. आणि या शोध नजरेतुनच धर्म,तत्वज्ञान, विज्ञान जन्म घेतात.

विश्वाच्या आदिकरणाला ईश्वर म्हणतात. परमार्थ म्हणजे ईश्वराचा शोध होय. परम म्हणजे ऊत्तम मुख्य अर्थ म्हणजे द्रव्य, संपत्ती किंवा फलप्राप्ती होय.

समर्थानी अर्थशास्त्राचा पण अभ्यास केला आहे. आणि आजच्या घडीला तो अभ्यास किती महत्वाचा आहे हे अर्थशास्त्राची विद्यार्थीनी म्हणून मला खुपच ऊपयुक्त वाटतो. मर्यादित साधने,अमर्यादित गरजा यांचा मेळ बसवणे म्हणजे अर्थशास्त्र होय.आणि हेच समर्थानी अध्यात्मिक विचाराने सांगितले आहे. ते म्हणतात भगवंताचे ज्ञान **(क्रमशः)**



## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

### नामाकरताच नाम घ्यावे

ज्योतिर्मय साहित्य

नाम हे निसरडयासारखे आहे. निसरडयावर गवत वाढत नाही आणि त्याच्यावर पाय पडला तर घसरतो त्याप्रमाणे नाम आपल्यावर उपाधी ठरू देत नाही. त्याला कोणत्याही उपकरणाची गरज लागत नाही. रोगी–निरोगी, विद्वान–अडाणी, श्रीमंत–गरीब, लहान–थोर, स्त्री–पुरूष, जात–गोत, यांपैकी कोणतीही गोष्ट असली तरी अडत नाही, नसली तरीही अडत नाही. नामाशिवाय दुसर्या कोणत्याही साधनाला शक्ती, बळ, पैसा वगैरे कोणत्या तरी गोष्टीची मदत लागते. असे हे अत्यंत उपाधिरहित असलेले नाम आपणही अत्यंत उपाधिरहित होऊन घेतले तरच त्यात आपल्याला प्रेम येईल. आपण उपाधिरहित होणे म्हणजे नाम हे केवळ नामाकरिताच, स्वत:च्या कल्याणाकरिताच घेणे, जगातल्या दुसर्या कशाहीकरिता न घेणे. आपण जर ते सकाम बुद्धीने घेतले तर इच्छित कार्यभागही साध्य होत नाही आणि आपले कल्याणही साधत नाही. सकाम नाम घेणे हे किती वाईट आहे हे सांगणे फार कठीण आहे. असे पहा की स्त्री ही अत्यंत पवित्र आहे, कारण देव, संत यांसारख्या विभूतिही तिच्यापोटी जन्म घेतात; अशा स्त्रियांना पळवून नेऊन अनीतीने वागायला भाग पाडून त्यावर पैसे मिळविण्याचा धंदा काही लोक करतात ही किती निंद्य गोष्ट आहे बरे ! पण सकाम नाम घेणे ही गोष्ट त्याच्याहीपेक्षा कितीतरी पटीने अधिक निंद्य आहे. म्हणून नाम हे नामाकरिताच घ्यावे, त्याचा संबंध आपल्या इच्छा–अपेक्षांशी ठेवू नये. नामाकरिता नाम घेतल्याने मन आपोआप अंतर्मुख होऊन जाते. नामाच्या साहाय्याने मन अंतर्मुख केल्यावर आनंद सापडतो. आपल्या हृदयातच तो सापडतो.

आपण तीन गोष्टींकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. पहिली, आचरण अगदी शुध्द ठेवावे; दुसरी, नामाला कधीही सोडू नये; आणि तिसरी, माझा सांभाळ करणारा कुणीतरी–म्हणजे सद्‌गुरू–आहे ही जाणीव जागृत ठेवावी. प्रत्येक माणसाला कशाचीतरी विशेष आवड असते; त्या आवडीमध्ये राहावे आणि त्यात जबरीने नाम घ्यावे. आत्मज्ञान व्हावे म्हणून त्याच्या मागे लागले तर ते लवकर होत नाही. भगवंताकडे लक्ष लागले म्हणजे ते आपोआप होते. भगवंताचे नाम घेणे हे ज्ञान होण्याचेच लक्षण आहे. उत्तम वस्तू नेहमी थोडीच असते. श्रीखंडामध्ये चक्का आणि साखर कितीतरी असते पण केशर किती थोडे घालावे लागते! तसे भगवंताच्या नामाचे आहे. रोज थोडे पण अगदी मनापासून आणि मोबदल्याची अपेक्षा न करता नाम घ्यावे ते फार काम करील. भगवंत हा सर्वसत्ताधीश खरा पण एका बाबतीत तो लुळापांगळा होतो व सहज अडकतो. भुंगा जसा लाकूड पोखरतो पण कमळांत अडकतो तीच स्थिती नामाच्या बाबतीत भगवंताची होते.

पाणी हे जसे शरीराचे जीवन आहे तसे नाम हे मनाचे जीवन आहे.






### वाचन–आनंद

आपल्या आयुष्यात, भावनिक विश्वात आनंद देणाऱ्या खूप काही गोष्ट आहेत. यातील एक महत्वाची गोष्ट आहे ती म्हणजे ''साहित्याचा आनंद ''. यासाठी आपल्याला वाचनाची आवड असायला हवी, मग या आवडीतून आपल्या मनाला सदा तजेलदार आनंद मिळत असतो.

आपल्याला आनंद देणारे साहित्य, त्याचे प्रकार प्रत्येकाच्या आवडीनुसार असतात, कथा, कादंबरी, लेख, कविता हे मुख्य प्रकार, यात पुन्हा ''पारिवारिक–कौटुंबिक, विनोदी, ग्रामीण, रहस्यमय, सामाजिक, वैचारिक, ललित, असे साहित्य जे मोठ्या प्रमाणावर वाचले जाते.

धार्मिक–अध्यात्मिक, ऐतिहासिक, वैज्ञानिक, भौगोलिक, संगीत, कला–शास्त्र, आणि इतर कलाविषयक साहित्य.

ज्याला जो साहित्य–लेखन प्रकार आवडतो, तो या वाचनाचा आनंद मिळवतो.

रोजचे दैनंदिन वर्तमान–पत्र, पेपर, आणि साप्ताहिके, मासिकं, ही जुनी माध्यम आहेतच यात ऑनलाईन वाचन

करण्याची सुविधा आहे, यातूनही आपल्या वाचनाची भूक भागवता येते, सकाळचा पहिला चहा आणि हातात ताजा

पेपर'' ही दृश्य तर सर्वपरिचित आहे.

व्यक्ती तितक्या प्रकृती असतात असे आपण म्हणतो . जसे स्वभाव वेगवेगळे असतात, तशी या वेगवेगळ्या

मनाची जडण–घडणही असते. सगळ्यांची वाचन आवड सारखी नसते, पण खुप जणांना वाचनाची आवड असते हेही तितकेच खरे आहे. तहानभूक विसरून पुस्तक वाचनात गुंग झालेली माणसे आपल्याला दिसतात, त्यांना मिळणारा आनंद कसा असतो हे ''वाचक झाल्याशिवाय नाही कळणार. पुस्तक–वेडी, वाचनवेडी मंडळीसाठी ''वाचनखाद्य'' पुरेसे असते. वाचनालय, लायब्ररी या ठिकाणी वाचनासाठी जाण्याची सवय माझ्या शालेय दिवसापासून मला लागली, १९५०, ६०, ७० या तीन दशकात शाळा, कॉलेज निमित्ताने

मराठवाड्यातील– वैजापूर, परभणी, हैद्राबाद, अंबाजोगाई, परळी वैजनाथ, अहमदपूर , या विविध ठिकाणी वास्तव्य झाले, या सर्व ठिकाणच्या वाचनालयातुन पुस्तके आणून वाचलीत. पुढे आणि आजतागायत वाचनाची आवड कायम आहे, वाचन–आवड असणे ही माझ्या परिवारातील सर्वांची आवड असल्याने कुठेही जा पुस्तके समोर असतात. पुस्तक परिचय, समीक्षण लेखन–करीत असल्यामुळे नामवंत साहित्यिकांची, नवोदित साहित्यिकांची येणारी नवी कोरी पुस्तके म्हणजे माझ्याकडे येणारे माझे आवडते मित्र आणि पाहुणे असतात. या सगळ्या पुस्तकांच्या सोबत माझी स्वतःची पुस्तके ही आनंदाने रहातात, पुस्तकाने भरलेले कपाट ही माझ्यासाठी खरी मौल्यवान तिजोरी आहे. हा आनंदाचा खजिना सदैव खुला आहे.



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**येषां न विद्या न तपो न दानं,**
**ज्ञानं न शीलं न गुणो न धर्मः ।**
**ते मृत्युलोके भुवि भारभूता,**
**मनुष्यरूपेण मृगाश्चरन्ति ।।**

अर्थ – ज्यांच्याकडे विद्या, तप, दान, ज्ञान, चरित्र, गुण, धर्म नाही असे लोक पृथ्वीला ओझे आहेत. ते मनुष्य रूपात विचरण करणारे पशू आहेत.

या श्लोकात महाकवी भर्तृहरींनी विद्या, तप, दान, ज्ञान, चरित्र, गुण आणि धर्म यांचे महत्व प्रतिपादन केले आहे. ज्या लोकांकडे विद्या, तप, दान, ज्ञान, चरित्र, गुण आणि धर्म नाहीत, अशी माणसे म्हणजे मनुष्याकृती पशू आहेत. असे लोक पृथ्वीसाठी ओझे मात्र आहेत. अर्थात अशा लोकांचा समाजजीवनास काही एक उपयोग होत नाही, या विषयीची खंत भर्तृहरींनी व्यक्त केली आहे.




### आरोग्याचे 'पांढरे शत्रू–'

**(मागील अंकावरून)**

फुफ्फुसांच्या आजाराने ग्रस्त असतात त्यांनी कमी सोडियम असलेले मीठ सेवन करावे किंवा आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

पांढरा भात किंवा तांदूळ : पांढरा तांदूळ हादेखील रिफाईड धान्य किंवा रिफाईड कार्ब यामध्ये मोडतो. रिफायनिंग करताना त्यात भुसा आणि ब्रान काढून टाकले जाते, त्यामुळे नैसर्गिक बी कॉम्प्लेक्स, लोह आणि तंतुमय पदार्थ बाहेर टाकले जातात. पांढरा तांदूळ आकर्षक होण्यासाठी जे पॉलिश केले जाते त्यामुळे तांदळातील पोषक घटक कमी होतात.



आरोग्य समस्या : पांढर्या तांदळाच्या दाण्यात एन्डोस्पर्म असतात जे शुद्ध स्टार्च असते. वैद्यकीय विश्वात स्टार्च हानिकारक समजले जाते. कारण, त्यामुळे इन्सुलिनची पातळी वाढते. सतत सेवन केल्यास रक्तात साखरेची पातळी वाढते आणि मधुमेहाचा धोका वाढवते.

पर्याय कोणता : शक्य असल्यास ब्राऊन राईस किंवा हातसडीचा तांदूळ सेवन करावा. त्यात फायबर आणि इतर पोषक घटक यांचे प्रमाण जास्त असते. हातसडीच्या तांदळावर फोलकट किंवा ब्रान तसेच असते. हा तंतुमय पदार्थांचा उत्तम स्रोत आहे. त्यात बी १२ जीवनसत्त्व, खनिजे आणि अमिनो ॲसिडस् असतात.

प्रिन्सटन विद्यापीठातील वैज्ञानिकांनी केलेल्या अभ्यासात असा निष्कर्ष निघाला की, साखरेचे सेवन केल्याने जी रसायने स्रवतात ती मेंदूतील मार्गाने पुढे जातात ज्या मार्गाने हेरोईनमधील रसायने जातात. कर्करोगग्रस्त पेशी जिवंत राहण्यासाठी आणि विकास होण्यासाठी जास्तीत जास्त प्रमाणात ग्लुकोजची आवश्यकता असते. ते साखरेपासून मिळते. २००९ सालामध्ये शिकागो विद्यापीठात झालेल्या एका संशोधनानुसार साखरेचे सेवन आणि पेशींची वयवृद्धी यांचा थेट संबंध आहे. ज्या व्यक्ती साखरेचे अतिसेवन करतात त्यांच्या शरीरातीलच नव्हे, तर मेंदूच्या पेशीदेखील लवकर म्हातार्या होतात. ज्या व्यक्ती आठवड्यातून पाच वेळा पांढरा तांदूळ सेवन करतात त्यांना मधुमेह होण्याची शक्यता १७ टक्क्यांनी वाढते.

**

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## ।। श्री स्वामी समर्थ ।।





ज्योतिर्मय साहित्य

स्वामी म्हणतात – पावसाचे थेंब छोटे जरी असले तरी त्याचे सतत पडत राहणे हे एका मोठ्या नदीला जन्म देतात त्याच प्रकारे रोजचे पाठवलेले छोटे–छोटे सूविचार जीवनात मोठे परिवर्तन घडवू शकतात.. ''सुख'' फुलासारखं असावं जे दररोज उमलत रहावं... ''दुःख'' हे गळणाऱ्या पानासारखं असावं जे क्षणात निघून जावं...

स्वामी म्हणतात – समजूत घालायला कुणी नसलं की स्वतःलाच बळ आणावं लागत !! ज्यांचे डोळे चांगले ते जगाच्या प्रेमात पडतात, पण ज्यांची जीभ गोड असेल तर जग त्यांच्या प्रेमात पडते...! एक व्यक्ती म्हणून मोठं होताना, कधीही माणूस म्हणून छोटे होऊ नका...

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**(मागील अंकावरून)**

रवींद्रनाथ म्हणतात, माझी शाळा संपल्यानंतरच माझे खरे शिक्षण सुरु झाले. आता हे सगळे वाचल्यानंतर आपला असा समज होण्याची शक्यता आहे की शाळा या आपल्या विकासाच्या आड येतात. त्यामुळे त्या बंद करायला हव्यात का ? अर्थात हा टोकाचा विचार झाला. सरसकट शाळांना दोष देण्यापेक्षा आपली जी प्रचलित शिक्षणपद्धती आहे, त्यात काही उपयुक्त सुधारणा करता येतील का ? अशा सुधारणा की ज्यातून माणूस घडेल, भारताचा भावी नागरिक सुदृढ घडेल. शिक्षणातून असा नागरिक घडावा की जो निसर्ग, देश आणि समस्त मानवजातीच्या कल्याणाचा विचार करू शकणारा असा असावा. त्यासाठीच आपण रवींद्रनाथ कसे घडत गेले हे पाहतो आहोत.

रवींद्रनाथांच्या घरात पिढीजात जमीनदारी होती. पण जमीनदारीचा अहंगंड आणि श्रेष्ठतेची गुर्मी नव्हती. रवींद्रनाथांनी लहानपणापासूनच आपल्यातील प्रतिभेचं दर्शन त्यांच्या वडीलधाऱ्यांना घडवलं होतं. काव्य, नाट्य, संगीत आदी कलांमधील त्यांची प्रतिभा भरारी घेत असतानाच त्यांचा वास्तवाशी परिचय व्हावा म्हणून त्यांच्या वडिलांनी त्यांना शहराकडून खेड्याकडे पाठवलं. शेतसारा किंवा खंड वसुलीचं काम त्यांच्यावर सोपवलं. गोरगरीब असलेल्या कुळांकडे, छोट्या छोट्या शेतकऱ्यांकडे आणि मजुरांकडे ते आपल्या कामानिमित्त गेले. पण या छोट्या रवींद्रचे डोळे ग्रामीण जीवन कमालीच्या संवेदनशीलतेनं टिपत होते. या लोकांचं दुःख, दैन्य, दारिद्र्य, अनारोग्य आदी गोष्टींनी भरलेलं जग पाहून ते कमालीचे अस्वस्थ झाले. शहरी आणि ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनशैलीमध्ये असलेली दरी त्यांनी अनुभवली. **(क्रमशः)**

# लोक संस्कृतीचा जागर कार्यक्रमात डॉ कन्नूलाल विटोरे यांचा सहभाग

## घनसावंगी येथे महाकवी कालिदास प्रतिष्ठानची शाखा स्थापित होणार

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**घनसावंगी** – महाकवि कालिदास प्रतिष्ठान पुणे या संस्थेतर्फेतर्फे दर वर्षा प्रमाणे या वर्षी ही दि. २ फेब्रुवारी (रविवार) रोजी वसंत पंचमी निमीत्त सरस्वती पूजनाचा व लोक संस्कृतीच्या स्मृती जागवण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास मॉडेल कॉलेज घनसावंगी चे हिंदी विभाग प्रमुख व महाकवी कालिदास प्रतिष्ठान चे मराठवाडा अध्यक्ष डॉ कन्नूलाल विटोरे हे उपस्थित होते. दरवर्षी वसंत पंचमीच्या निमित्ताने सरस्वती पूजन कार्यक्रम आयोजित करण्यात येतो व त्यानिमित्ताने कवी संमेलन असेच विविध साहित्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. या वर्षी लोक साहित्याचा जागर करण्यात आला. प्रसंगी उपस्थित पन्नासहून अधिक कवी कवयित्रींनी आपल्या आठवणीत असलेल्या विविध लोकगीत, भोंडला, हदगा, पिंगळा, वासुदेव, जात्यावरची ओवी, भारुड, उखाणा, अभंग, आरती, बडबडगीत, खेळ गीत, पोवाडा, गुरखा गीत, आणि लोकगीताच्या लयीत रचलेल्या कविता





सर्व मान्यवर कवी/ कवयित्री यांनी आपल्या सादरीकरणातून अत्यंत उत्साहात वसंतोत्सवाचे औचित्य साधून सादर केले.

"लोकगीते हा भारतीय साहित्यातील प्राचीन कलासंस्कृतीचा समृद्ध आणि श्रीमंत ठेवा आहे असे उद्गार ज्येष्ठ साहित्यिक भावकवी वि.ग. सातपुते यांनी काढले. महाकवी प्रतिष्ठानच्या माध्यमातून देशभरातील नव लेखक, साहित्यिकांना जोडण्याची भूमिका विशद करत मराठवाड्यात घनसावंगी येथे महाकवी कालिदास प्रतिष्ठानची शाखा स्थापन करण्याचा मानस व्यक्त केला.

या प्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते आणि कार्याध्यक्ष काकासो चव्हाण यांनी लोकगीत आणि लोक साहित्याच्या वसा आणि वारसा नव्या पिढीने जपावे असे सांगितले. उपाध्यक्ष तथा मराठी हिंदी भाषाचे विद्वान अनुवादक लोक साहित्याचे अभ्यासक डॉ. महेंद्रकुमार ठाकुर दास (बाबूजी) यांनी "लोककला , लोकसंस्कृती आणि त्याची आज असणारी सामाजिक गरज आणि त्यातून होणारे संस्कार या बाबत विवेचन करत आजच्या अति भौतिक, बौद्धिक युगातही लोकगीत, लोक साहित्य त्यांची प्रासंगिकता असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी उपाध्यक्ष ऍड. संध्या गोळे, ऋचा कर्वे, मकरंद घाणेकर , सौ. राधिका दाते , यशवंत देव, सुरेश शेठ, डॉ. लक्ष्मण शिवणेकर, किरण जोशी, मृणाल जैन पुष्पा कुलकर्णी, अंजली महाजन, मीना सातपुते, ज्योती सरदेसाई मनिषा आवेकर, राजश्री सोले, अश्विनी पिंगळे, शांतीलाल ननवरे, प्रतिभा पवार अशोक भांबुरे, सुनीता टिल्लू , शुभदा उदगावकर, सतीश शिंगवेकर, तेजल चव्हाण, मंगल आपटे, केतकी देशपांडे, अपर्णा आंबेडकर, मिनाक्षीताई नवले, साधना शेळके, विजय जाधव, मृदुला कुलकर्णी, संभाजी टरले ( राजे गावकर), नंदकिशोर गावडे, शोभा देशपांडे, बाबासाहेब ठाकूर, जयंतराव देशपांडे, जयश्री श्रोत्रीय, अनील कुलकर्णी, वंदना पुरोहित, जया ठाकुरदास, प्रभावती कुलकर्णी, डॉ. दाक्षायणी पंडित, ऍड. प्रार्थना सदावर्ते, ऍड. उमाकांत अदमाने यांनी आपल्या रचना सादर केल्या. या वसंत पंचमी कार्यक्रमात डॉ कन्नूलाल विटोरे यानी गाईचा महिमा असलेले लोकगीत सादर केले. व सांगितले की " मराठीची आद्य कवयित्री महदंबेच्या जन्म भूमीत व दक्षिण काशी खळखळ वाहणाऱ्या गोदामाईच्या सानिध्यात तसेच समर्थ रामदासांच्या या पुनीत भूमीत चक्रधरांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या आहेरमल गड शेजारी लवकरच महाकवी कालिदास प्रतिष्ठानच्या वतीने साहित्याचा उत्सव साजरा करूयात परिसरातील नव लेखक,कवींना व ज्येष्ठ साहित्यिकांना सोबत घेऊन समन्वय साधून लवकरच साहित्याचा उत्सव साजरा करण्याची भावना त्यांनी व्यक्त केली. सूत्रसंचालन कवी ऋचा यांनी तर आभारप्रदर्शन राधिका दाते यांनी मानले.

# काय म्हणतील लोक..!

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**




आपल्या मनात अनेकदा, अनेक विषयाच्या बाबतीत अनेक कल्पना सुचत असतात. तर कधी, कधी अनेक विचार सुद्धा येत असतात. त्यावेळी काही करायचे ठरवल्या नंतर एक मन हो म्हणतो तर दुसरा मन मानत नाही. कारण आपल्याला वाटत असते की, मी जर हे कार्य केले तर काय म्हणतील लोक. ..? माझ्यावर हसणार तर नाही ना...? माझी निंदा तर करणार नाही. ..? बस हीच भीती सतत आपल्याला वाटत असते आणि याच भीतीमुळे वेळही निघून जाते सोबतच जे करायचे तेही राहुन जाते. कारण करायचे आपल्याला मात्र आपल्या मनावर नको त्या विकाराचे राज्य असल्यामुळे सर्व काही संपून जाते. असो, आज *काय म्हणतील लोक* या विषयावरचा काव्यसंग्रह माझ्या पर्यंत पोहोचला आहे. या काव्यसंग्रहाचे कवी प्रा.नीरज आत्राम सध्या वरोरा येथे राहत आहेत.कवी नीरज आत्राम यांचा हा पहिलाच काव्यसंग्रह आहे. या साहित्य वारीत कवी नीरज यांचे नाव विशेष गाजलेले आहे सोबतच ते अनेक पुरस्काराने सन्मानित आहेत. अतिशय सुंदर असा काव्यसंग्रह समीक्षण करण्यासाठी माझ्या पर्यंत पोहोचविले त्याबद्दल कवीचे मी मनापासून आभारी आहे. या काव्यसंग्रहाला प्रस्तावना देणारे लेखक अशोक कुबडे, शुभेच्छा संदेश देणारे, कवयित्री प्रांजली काळबेंडे, या काव्यसंग्रहावर व्यक्त होणारे लेखक आनंद घोडगे, सोबतच महत्वाचे दोन शब्द लिहून देणारे प्रसिद्ध समीक्षक डॉ.शाम मोहरकर, आणि साहित्यिक चंद्रकांत वानखेडे या सर्व साहित्य प्रेमींनी या काव्यसंग्रहाचे भरभरून कौतुक केले आहेत. कारण या काव्यसंग्रहातील प्रत्येक कविता वाचनीय आहेत सोबतच अनेक विषयावरील कविता आहेत काही कविता वास्तव परिस्थितीवर आधारित आहेत तर काही कविता कवीच्या मनाशी जुळलेल्या आहेत. मी सर्वच कविता वाचल्या मनाला खूप समाधान मिळाले आणि मलाही खूप काही शिकायला मिळालं.



**पुस्तक परीक्षण**

सौ.संगीता संतोष ठलाल
मु. कुरखेडा जि. गडचिरोली
मो. ७८२१८१६४८५

या काव्यसंग्रहातून मला आवडलेली कविता "सुख मानून राहायचे" त्यातील काही ओळी –

का कुणाला दुःख
आपले सांगायचे
दुःखामध्येही सुख मानून घ्यायचे
का कुणाला दुखवायचे गरज नसताना
दुःखीतांना आनंदाने सुख थोडे वाटायचे

माणसाचं जीवन म्हटल्यावर त्यात सुख, दुःख, वेदना, अडीअडचणी, त्रास येतोच कारण ते सर्व सहन करण्याची माणसात ताकद असते. कारण मनुष्य असा एकमेव प्राणी आहे की त्याला बोलता येतं, चालता येतं या सर्वच गोष्टीविषयी त्याला चांगल्याप्रकारे अनुभव आलेले असतात तरीही काही माणसं दुःखाला कंटाळून आत्महत्या करण्याचा प्रयत्न करत असतात. सर्वांना माहीत आहे की आत्महत्या करणे पाप आहे तरीही चुकीचे पाऊल उचलायला मागे, पुढे बघत नाही कारण जीवनाचा खरा अर्थ त्यांना कळत नाही. **(क्रमशः)**

# शाळेच्या वाटेवर कित्ती ही मज्जा...

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

शाळेच्या वाटेवर कित्ती ही मज्जा
कित्ती ही मज्जा...
शास्त्र समाजाचे इतिहास जमा
गणिताचा येई पोटात गोळा....
तास आवडे चित्रकलेचा
गाणी – गोष्टी नी दंगामस्तीचा
मैदानावरचे वीर हो आम्ही..
खेळातून करू अभ्यास वजा
अभ्यास वजा...
शाळेच्या वाटेवर कितीही मज्जा
किती ही मज्जा......



ही कविता अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे यांनी श्री शिवाजी मराठा सोसायटी, पुणे च्या सहकार्याने ५ वे अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलन पुणे येथे ३०,३१ जानेवारी २०२५ रोजी पुणे येथे आयोजित केले होते त्यामध्ये एका कवयित्रीने सादर केली. मी दोन्ही दिवस पूर्णपणे बालकुमारांचे हे संमेलन

पूर्णपणे ऐकले व आनंद घेतला आणि माझे प्रबोधनही झाले . ही कविता व इतर कवीताही मी पूर्णपणे ऐकल्या . दोन दिवसांचा संमेलना मधील विद्यार्थ्यांचा सहभाग हा सर्वांनाच अत्यानंद देऊन गेला. बालकुमारांचे कथाकथन, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, बालकुमारांचे काव्यसंमेलन, बाल नाट्यछटा, बाल एकांकिका हे कार्यक्रम दोन दिवसांत विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी सादर केले.

३० जाने. २०२५ रोजी दुपारी २ ते ३ या वेळेमध्ये विधार्थ्यांनी सादर केलेल्या कथाकथनामध्ये अहिल्यादेवी हायस्कूलच्या राही पोहनेकर, सई रोकडे यांनी तर ज्ञानप्रबोधिनी शाळेच्या अस्मि कुलकर्णी, स्पृहा साठे यांनी व न्यू इंग्लिश स्कूल– रमणबागच्याच्या आदित्य जंगम, शार्दुल करळे आणि लोकनेते यशवंतराव चव्हाण महानगरपालिका विद्यानिकेतन क्रमांक ६, येरवडा या शाळेच्या स्वरा मासकर, चैताली कांबळे तसेच आणखीन एका शाळेच्या अर्णव घोडके यांचा समावेश होता. कथाकथनाच्या या कार्यक्रमांने बालकुमार साहित्यसंमेलनाचा खरा बिगुल वाजला. उद्घाटन समारंभानंतर सादर झालेल्या या कथाकथन कार्यक्रमाने साने गुरुजी मंडपामधील विद्यार्थी, पालक, शिक्षक, रसिक श्रोते यांची मने उल्हसित केली. विद्यार्थी आनंद घेत असतानाच आपण त्या व्यासपीठावर जाऊन कथाकथन सादर करावे असा भाव ऐकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आनंदी चेह–यावर दिसत होता.



शिरीष चिटणीस

सादर केलेल्या कथाकथनामध्ये ज्या शाळा सहभागी होत्या, त्यामध्ये पुणे महानगरपालिकेची एकच शाळा सहभागी होती. लोकनेने यशवंतराव चव्हाण मनपा विद्यानिकेतन शाळा क्रमांक ६, येरवडा. या शाळेच्या शिक्षिका डॉ. लता पाडेकर अमरेंद्र भास्कर मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या सभासद या राजन लाखे, दिलीप गरूड आणि इतर पदाधिका–यांच्या संपर्कात असल्याने सहभागी होत्या. नुसत्या डॉ. लता पाडेकर सहभागी नव्हत्या, तर त्यांनी व त्यांच्या सर्व शिक्षकांनी या शाळेच्या विद्यार्थ्यांचा सर्व कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला. महानगरपालिकेच्या या शाळेचे विद्यार्थी पुणे शहरातील सहभागी शाळांच्या विद्यार्थ्यांबरोबर कथाकथन, सांस्कृतिक कार्यक्रम,कविसंमेलन, नाट्यछटा, बालनाट्य या सर्व प्रकारात स्पर्धेमध्ये तोडीस तोड सादरीकरण करीत होते. हे सर्व बघून मी शिक्षिका डॉ. लला पाडेकर यांच्याशी संवाद साधला आणि त्या व त्यांचे सर्व शिक्षक सहकारी जे त्यांच्या मराठी शाळेमध्ये राबवित असलेल्या विविध उपक्रमांबद्दल बद्दल त्या सर्वांचे अभिनंदन केले.मला अत्यानंद झाला.

डॉ.लता पाडेकर सांगत होत्यामहानगरपालिके तर्फ एकूण ३२७ शाळा चालविल्या जातात. यामध्ये मराठी माध्यमाच्या २५०, इंग्रजी माध्यमाच्या ५४, विद्यानिकेतन या नावाने १५ (यामध्ये बालकुमार संमेलनामध्ये सहभागी झालेले शाळा क्रमांक सहा आहे),उर्दू माध्यमाच्या तीन, क्रीडानिकेतन तीन आणि कन्नड दोन याचा समावेश आहे. लोकनेते यशवंतराव चव्हाण मनपा विद्यानिकेतन क्रमांक सहा येरवडा ही सुमारे २५५ पट असलेली विद्यार्थ्यांची शाळा आहे. विद्यानिकेतन आणि क्रीडानिकेतन या शाळा ४ ते ८ वी पर्यंत वर्ग असलेल्या आहेत. ४ ते ८ वी विद्यानिकेतन क्रमांक ६ या शाळेमध्ये १० शिक्षकांचा सहभाग आहे.या शाळेमध्ये येणारे विद्यार्थी हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असले तरी गुणवत्तेच्या दृष्टीने परिपूर्ण करण्यासाठी, अभ्यासाबरोबरच अभ्यासपूरक उपक्रम राबविताना या विद्यार्थ्यांमधील चमक या निमीत्ताने दिसून येते. या शाळेतील शालेय परिपाठ हा देखील नियमितपणे विद्यार्थ्यांमधील सभाधीटपणा, वेळेचे नियोजन, नेतृत्व, सहकार्य अशा गुणांचं संवर्धन करणारा आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक शिक्षक विद्यार्थ्यांमधील कलागुण हेरून त्यांच्या सुप्त गुणांचा विकास करण्यासाठी प्रयत्नवत असतो. मराठी साहित्याची अभिरुची निर्माण करण्यासाठी विविध दिनविशेष, बालसभा, मराठी राजभाषा दिन इत्यादी उपक्रम यासाठी पूरक ठरणारे आहेत.


त्या पुढे सांगत होत्या.... ५ व्या अखिल भारतीय मराठी बालकुमार संमेलनामध्ये आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी कथाकथन, नाट्यछटा, स्वलिखित कविता सादरीकरण, बालनाट्य यामध्ये भाग घेतला. या विद्यार्थ्यांची तयारी करून घेणे एक दिव्य असतं. पण आम्ही शिक्षक व पालक अशी दुहेरी भूमिका बजावत हे सर्व करून घेत असतो. विद्यार्थी वर्ग आमच्यावर आई–वडीलांसारखाच जिव्हाळा व्यक्त करतात.ज्यामुळे आम्ही भारावून जातो. हातावर पोट भरणारे पालक असल्याने विद्यार्थ्यांना अशा कार्यक्रमांना नेणे, आणणे आणि कधीतरी खाण्याची सोयही शिक्षकच करीत असतात. अध्ययन अध्यापना शिवाय फुरसदीच्या वेळात, व्हॉटस्अॅप – व्हिडीओ कॉल व्दारे चित्र, शिल्प, नृत्य, नाट्य, गायन वादन या कलांचे सराव घेत असतो. या संमेलनामध्ये ज्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता, ते विद्यार्थी नियमीत योग प्राणायम आणि सूर्यनमस्कार करणारे असल्याने एकपाठी व हुषार आहेत. अनेकदा विद्यार्थी व्यक्त होत नाहीत. पण व्यक्त झाले कि, यांच्यातील कुशाग्रता दिसून येते. त्यासाठी त्यांचे व पालकांचे प्रबोधन, समुपदेशन आम्ही सर्व शिक्षक करीत असतो.

हे सर्व ऐकल्यावर मराठी शाळांना भवितव्य नाही असे कोण म्हणते ? असा विचार माझ्या मनात निर्माण झाला. अशा प्रकारच्या मराठी शाळेमध्ये इंग्रजी शाळांमधून आपला पाल्य काढून ते या शाळांमध्ये आपल्या पाल्यासाठी प्रवेश घेतील हे निश्चीतच.शिक्षकच पालक आणि शिक्षकाची भूमिका या शाळेत उत्तमरित्या निभावतात हे महत्वाचे

कववित्रीने म्हंटलेल्या त्या कवितेमध्ये शेवटचे कडवे असे आहे....

नको गृहपाठ, नको परीक्षा
तरी हवीशी सरांची शिक्षा....
गुरुवीण नाही मार्ग यशाचा
भरूनी देती धडा ज्ञानाचा
कास धरूनी सदा ख–याची...ऽऽ
खोटेपणाचा उडवूया फज्जा
उडवूया फज्जा...
शाळेच्या वाटेवर किती ही मज्जा.

या कडव्याने माझ्या मनात आनंदझरा निर्माण होऊन शिक्षकांचे महत्व अधोरेखित केले. कितीही तंत्रज्ञान अद्ययावत झाले तरी हाडामांसाचा शिक्षक हेच विद्यार्थ्यांचे दैवत.



# परीक्षेला जाता जाता....!

ज्योतिर्मय साहित्य

आणि...तो १०० हा अंक रोज एका एका ने कमी होत तो अंक ७५ वर आला.आणि न राहून मुलांना मी विचारलेच हे कोण रोज रोज करतेय. छोटू म्हणाला आई,ताई करतेय हे. अग आई,तो अंक ताई बदलतेय. मग मी ही ताईला म्हटले. ''काय आहे ग हे?'' तेव्हा त्यामागचे खरे कारण लक्षात आले. की बारावी बोर्ड परीक्षेचे वेळापत्रक आल्यानंतर तो अंक लिहला गेला होता . अर्थात तो अंक शून्यावर येईल त्या दिवशी बारावीचा बोर्डचा पहिला पेपर आहे.आणि मग मलाही वाटले खरचं आज कालची पिढी खरोखर दोन पावले पुढेच आहे याची जाणीव झाली. आणि मी ही उत्सुकतेने तो अंक तीन अंकातून दोन अंकात येताना आणि दोन अंकातून एक अंकात येताना पाहिले.

रोजच्या धावपळीच्या आयुष्यात काल सहज पुन्हा त्याकडे लक्ष गेले. आणि वाटले खरचं आत्ता आत्ता तर पाहत होते,एवढ्यात हा एवढ्यावर आला, असेच काहीसे झाले.आणि असे वाटले एवढ्यातच तो अंक शून्यावर येईल. आणि मग मनाची चंचलता आणि हातातली लेखनी स्वस्थ बसू देत नव्हती. आणि मग त्यातून झालेला हा लेखन प्रपंच. विद्यार्थी मित्रांनो, म्हणजे मला तरी असे वाटते, परीक्षेच्या चर्चा , ताण,नियोजन यात विद्यार्थ्यांचा आणि पालकांचाही कस लागतो.आणि त्यामुळे विद्यार्थ्यांना येणारा ताण त्याला शांततेने संयमाने आत्मविश्वासाने जेवढे सामोरे जाता येईल तेवढे गेले पाहिजे. विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन व्यवस्थित करायला हवे. पालकांचे मार्गदर्शन पाल्यानी समजून घेण्याची गरज आहे. आणि पालकांनी ही अपेक्षांचे ताण समजून घेऊन आपल्या पाल्याला



समजावून मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. असे मला वाटते. तसेच शिक्षकांचे अमूल्य मार्गदर्शन ही मुलांना या वेळेत गरजेचे आहे. आपल्या मित्र मैत्रिणीचे मोठी ताई दादा यांचे सहकार्य ही अशा वेळी उपयोगी पडू शकते. परीक्षा आता आठ दिवसांवर आली आहे.

आता वर्ष भर केलेल्या मेहनतीचे फळ मिळणार आहेच. पहिले अभ्यासाचे नियोजन आता बदलून आत्ता विषय निहाय नविन वेळापत्रक बनवा. योग्य व्यवस्थित जे कठीण वाटते त्यावर लक्षपूर्वक ध्यान देणे गरजेचे आहे. या साऱ्यात मुळात इतक्या दिवसांत होणारी धावपळ दगदग कमी करून स्वतःचे शरीर कसे व्यवस्थित ठेवता येईल. शांत झोप होणे किती गरजेचे आहे याची जाणीव व्हायला हवी.अभ्यासाचा कौशल्य पूर्ण वापर करून अभ्यासाचे विषयाचे नियोजन होणे गरजेचे आहे. मला तर वाटते विद्यार्थी मित्रांनो आता थोडे रिलॅक्स व्हा. कधीतरी घराभोवती सोसायटीतील प्रांगणातून थोडेसे फिरून या आसपासची फुल झाडे वेली पहा शांत अशा निसर्गातून छानशी शत पावली करून तुमचे मन शांत करा. आणि मग कसलाही विचार न करता एखाद्या विषयाचे अवलोकन करायला घ्या आणि मग कसे वाटते ते बघा.



सौ.वैशाली चंद्रकांत महाडिक
निनाम –सातारा

थोडासा व्यायाम किंवा खेळ खेळा.मोबाईल वरचा खेळ अजिबात नाही बरं का!तुम्ही स्वतः तुमच्याशी प्रामाणिक रहा.आणि प्रामाणिक पणे स्वतःला एक प्रश्न विचारा,की कोणता अभ्यास करण्याची मला गरज आहे.त्याची काठिण्य पातळी काय आहे.याची चर्चा मित्राशी किंवा मग आपल्या विषय शिक्षकांशी निःसंकोच पणे करा. त्याला स्वतःच्या पातळीवर सोडवण्याचा प्रयत्न करावा.

हे सर्व करताना चर्चे चर्चे दरम्यान त्याचा इतका अभ्यास झाला ,माझा अजून खूप बाकी आहे. अशी परिस्थिती बऱ्याचदा निर्माण होते.अशा वेळी गोंधळून जाऊ नका.स्वतःचा आत्मविश्वास वाढवा. आपली आपल्याशीच स्पर्धा आहे असे समजा. आणि गेलेल्या वेळेचा जास्त विचार करत बसू नका. अशा अनेक स्पर्धा परीक्षा अजून तुम्हाला द्यायच्या आहेत. इथेच सर्व काही संपले आहे असे काही नाही.आणि हे नाही तर प्रयत्न करणाऱ्याला असे अनेक मार्ग असतात.

झालेल्या पेपरची चर्चा करून तो आपण पुन्हा देणार नाही होत. त्यामुळे थोडीफार चर्चा करा. त्याचा ताण घेऊ नका. इथे मला सद्गुरू वामनराव पै यांच्या एका वाक्याची आठवण झाली . त्यांनी म्हटल्याप्रमाणे तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार आणि फक्त एकच की मी ना मी हे करूच शकतो.कारण प्रत्येकाच्या आत काहीतरी वेगळे आहे. याची जाणीव स्वतः करून घ्या. कधीतरी एखादी खट्याळ वेळ येते तेंव्हा तुमच्या आसपास कोणी नाही असे वाटते पण एक लक्षात ठेवा त्यावेळी तुमच्या आसपास तुमच्यातला एक चांगला माणूस ही तिथेच सोबत असतो.त्याला खचू देऊ नका. यश त्याच्या आसपासच असते. शिक्षकांनी विद्यापीठांनी दिलेले नियम समजून घेऊन अवलोकन करा.म्हणजे आयत्या वेळी गोंधळ होणार नाही . हे सर्व लिहताना ही मला कुठेतरी वाटले सर्वजण उपदेशाचेच डोस देतात त्यात अजून तुझे शाला. पण मनापासून शुभेच्छा द्याव्या वाटल्या. खरेच थांबते इथे. जाता जाता फक्त एकच...

नको घेऊ मानवा तू माघार.
प्रामाणिक प्रयत्नाने सुयशाचा
नक्कीच गळ्यात पडेल हार.
शांत सुविचाराने कितीही
बिकट वाट होईल पार.
परीक्षेसाठी आणि उत्तम यशासाठी सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा.


***

# मराठवाड्याचे रवींद्रनाथ टागोर–कविवर्य श्री.दि.इनामदार


ज्योतिर्मय साहित्य

रसिक मित्र हो नमस्कार

१९७३–ते २००६ ही ३३ वर्षे माझ्या स्टेट बँक ऑफ हैदराबाद मधील नोकरीचा कार्यकाळ आहे. आकडेमोड आणि पैश्याच्या व्यवहाराचे हे विश्व. गेल्या पिढीत बँकेत काम करणारी माणसे इतर क्षेत्रात वावरण्यास फार इच्छुक नसत, फारसे उत्सुक नसत. बँकेतील नोकरी ''या सुरक्षित फ्रेममधल्या पारिवारिक विश्वात ही सगळी मंडळी ''सुखी, आनंदी होती.''




अशा पिढीतले माझे मित्र निवृत्त बँक सहकारी चारुदत्त पिंगळीकर यांचे वडील, (स्व)–श्री.रामराव पिंगळीकर हे बँक अधिकारी ,उत्तम कवी आणि कीर्तनकार म्हणून सर्वपरिचित होते. कवी राम पिंगळीकर ''हे त्यांचे साहित्यिक नांव. या नंतर १९७० ते २००० अशा ५० वर्षांच्या दीर्घकालात आपल्या काव्य–लेखनाने ''मराठवाड्याचे रवींद्रनाथ टागोर'' या गौरवपूर्ण उपाधीने ''सन्मानित झालेले, आमच्या हैद्राबाद बँकेतील अधिकारी व ''कवी मनाचे व्यक्तिमत्त्व लाभलेले कविवर्य श्री.दि. इनामदार ''.



अरुण वि. देशपांडे-पुणे
9850177342

हे माझ्या वडिलांचे सहकारी मित्र, आपल्या या कवी मित्राच्या कविता–लेखन– निर्मितीचे माझे वडील बाप्पा तथा व्ही.एच.देशपांडे, हे साक्षीदार होते. आठवणींच्या ओघात माझे वडील, मित्र कवी इनामदार यांच्या कवितेबद्दल आपुलकीने मला सांगत. मित्र हो– १९८४ पासून माझा लेखनप्रवास सुरु झाला, यात १९९५ नंतर ''कवी''म्हणून मला थोडी थोडी ओळख मिळू लागली. कविवर्य श्री.दि.इनामदार यांना माझ्या कविता लेखन धडपडीचे कौतुक होते, त्यापेक्षा आनंद जास्त होता, ते म्हणायचे – ''माझ्या नंतर माझ्या मित्राचा मुलगा कवी म्हणून ओळखला जाईल ''याची मला खात्री आहे. त्यांच्या शुभेच्छा व आशीर्वाद शब्द अंशतः खरे होत आहेत याचा मला आनंद वाटतो.

माझ्या कविता लेखनाचा ''श्री गणेशा'', कविवर्य श्री.दि.इनामदार यांच्या सहवासात झालाय. त्यांच्या मृदूकोमल, हळव्या कवितांचा प्रभाव माझ्या कविता लेखनावर आहे'' हे मी मोठ्या भक्तीभावाने सांगत असतो. मराठी कविता क्षेत्रात कवी श्री.दि.यांच्या लोभस कवितेला मानाचे स्थान आहे'' हे माझ्या नव्या पिढीला अभिमानाने सांगू इच्छितो. ०५ फेब्रुवारी –कविवर्य श्री दि इनामदार यांचा जन्मदिवस, त्यांच्या स्मृतीस ही शब्दांजली सादर अर्पण करतो.

# ज्येष्ठ नागरिक कलावंतांचा सत्कार




ज्योतिर्मय साहित्य

**पुणे –** पिंपरी – चिंचवड ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या वतीने घेण्यात आलेल्या '' संगीत सरीता '' या गीत गायन स्पर्धेत पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे सदस्य बाळकृष्ण चौधरी आणि शशिकांत लोकरस यांच्यासह विशेष प्राविण्य मिळवलेल्या २६ ज्येष्ठ कलावंतांना प्रशस्तीपत्र आणि स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. वल्लभनगर येथील मंगलसेन बहेल विरंगुळा केंद्र येथे बुधवार दि. ५ रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषालीताई मरळ यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागातील अनिकेत सातपुते, संगीता इंद्राक्षे, विशाल शेंडगे तसेच साई हॉस्पीटलचे डॉ. रवी केरळकर आणि डॉ. गुरमीत कौर उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ नागरिक महासंघाचे ईश्वरलाल चौधरी, अरुण बागडे, हेमचंद जावळे, शांताराम सातव, बाळकृष्ण गायकवाड, माधव अडसुळे, सुनिता कोकाटे, विजय शिनकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. स्पर्धेतील यशस्वी सहभागाबद्दल बाळकृष्ण चौधरी आणि शशिकांत लोकरस या दोन ज्येष्ठ कलावंतांचे पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने सचिव सखाराम ढाकणे तसेच अशोक येळंमकर आणि प्रेमलाल लांजेवार यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून विशेष अभिनंदन केले

# प्रा.अशोक कामतसरांना भावपूर्ण श्रद्धांजली

ज्योतिर्मय साहित्य

संत साहित्यात रमणारा विद्यार्थी सरांना ओळखतो. मला सरांचा सहवास गरवारे कॉलेज मध्ये लाभला त्यांच्यामुळे विचारांत प्रगल्भता आली. सहजसोपे विचार पण अत्यंत प्रभावी मांडणी हे त्यांच्या वैचारिक बैठकीचे महत्व होते. कामत सर हातात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आले नव्हते. भारतीय अर्थव्यवस्था ही पूर्वापार शेतीवर अवलंबून असल्याने कर्नाटकातील कारवार व त्यातील अवसरे गाव त्याला अपवाद नव्हते,पडेल ते काम करून सतत वारावर जेऊन भूक भागविणारा हा विद्यार्थी पुढे संत विचारांचे कार्य हाती घेऊन विद्या व्यासंगता जोपासत हिंदी व मराठी भाषेत पीएचडी करून ७५ हून अधिक ग्रंथांचे लेखन करून लहानपणी केलेल्या कष्टाचं चीज करणारा संत साहित्यक झाला.संत साहित्यात रमणारा प्रत्येकजण भारतीय संस्कृती व त्याअनुषंगाने जपावे लागणारे सामाजिक भान वैचारिक प्रगल्भता त्याचा प्रचार व प्रसार संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर, तुकाराम महाराज व दासबोधाचे समास त्यावर लिखाण , संत नामदेवांच्या जीवन कार्यावर आधारित संत वचन ह्याची दखल घेतो,कामत सरही त्याला अपवाद नव्हते. त्यांनी तर अशक्य ते शक्य करून दाखवले. संत नामदेवांच्या पंजाबातील घुमान येथे जाऊन हिंदू शीख यांना एकत्र जोडले. राष्ट्रीय एकात्मता निर्माण केली.

सरांनी गुरूकुल प्रतिष्ठानची स्थापना केली, माझ्या सारख्या अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी प्रोत्साहन दिले.



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

''स्वातंत्र्याची ७५ वर्षे'' या माझ्या लेखाला अभ्यास पूर्ण लेखन म्हणून गौरविले. कर्वे रोडच्या स्वामी कृपा हॉलमध्ये माझ्या सारख्या विद्यार्थ्यीला सन्मानित केले. अध्यक्ष जेष्ठ श्रेष्ठ अभ्यासक अविनाश धर्माधिकारी सरांना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलवले. तेव्हा कामत सरांनी एक फोन केला तरी हा बंदा हजर रहाणार असे गौरविले होते यावरून सरांचा मोठेपणा समजतो.

'' कर्मण्येवाधिकारस्ते। मा फलेषु कदाचन् ''

माझ्या सारख्या साध्या विद्यार्थ्यांना त्यांनी यशाच्या शिडीवर चढण्यासाठी प्रोत्साहन दिले हे मी माझे भाग्य समजते. अजून खूप काही लिहायचे आहे कामत सर जरी आपल्यात नसले तरी त्यांच्या साहित्याचा वारसा जपून ठेऊ.त्याप्रमाणे लिहिण्याचा प्रयत्न करू !!



कामत सरांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# मोबाईलपासून मुलांना वाचवायचे असेल तर हातात द्या पुस्तक

ज्योतिर्मय साहित्य

मोबाईलपासून मुलांना वाचवायचे असेल तर हातात द्या पुस्तक. ''आमचा सोनू मोबाईलशी इतका मस्त खेळतो की मला घरातील कामे अगदी निवांत करता येतात'' स्वाती शेजारच्या सुवर्णाला अभिमानाने सांगत होती. '' हो का, अरे वा छानच.'' सुवर्णा कौतुकाच्या स्वरात म्हणाली. ''अगं स्वाती, तुला काय सांगू बघ.आमची हेमांगी तर गेम खेळण्यात एवढी रमते की तहान भूकही विसरते आणि हो, तुला सांगते फोटो तर इतके सुंदर काढते की आमच्या घरात फोटोसाठी मोबाईल तिच्याकडेच असतो.'' सुवर्णाने असे सांगितल्यावर स्वातीनेही आश्चर्याने तिचे कौतुक केले. यातील सोनू अडीच तीन वर्षाचा तर हेमांगी दुसरीत शिकणारी मुलगी.

खरं तर कमी अधिक प्रमाणात ब–याच कुटुंबात मुलांना सांभाळायला मोठे माणूस नाही किंवा स्वयंपाक करणे, भांडी घासणे, कपडे धुणे, घराची स्वच्छता करणे अशा कामाच्या वेळी मुलांचा अडथळा किंवा व्यत्यय नको म्हणून खेळायला मोबाईल दिला जातो. त्यात असणारे गेम्स, व्हिडीओ, छोटी मुले आवडीने पाहतात खेळतात. इतक्या लहान वयात त्याला मोबाईलमधील सगळे येते याचा आपल्या अभिमान आणि कौतुक वाटते. नातेवाईकांना किंवा मित्रमंडळीना मोठ्या आनंदाने आपण सांगत असतो. कालांतराने त्या लहान बाळाला मोबाईलची इतकी सवय होते की खेळताना, जेवताना, अगदी झोपताना सुद्धा जवळ मोबाईलच हवा असतो. नाही दिला तर ते चिडते, रुसते, रागवते घरातील वस्तूंची आदळआपट करते. लहान आहे, त्याला अजून कळत नाही, मोठा झाल्यावर नाही असे करणार. असे म्हणून त्याला शांत करण्यासाठी त्याच्या हाती मोबाईल दिला जातो. एक प्रकारे आपणच त्याला मोबाईलच्या विळख्यात अडकवत असतो. हे आपल्या लक्षात येत नाही.ज्यावेळी लक्षात येते त्यावेळी परिस्थिती हाताबाहेर गेलेली असते.

मूल आपले काही ऐकत नाही. त्यावेळी आपण हतबल होतो. चिंताग्रस्त होऊन काळजीत पडतो. काय करावे सुचत नाही.

आपणच ही परिस्थिती ओढवून घेतलेली असते.

मोबाईल हे एक संदेशवहनाचे साधन आहे.आपण त्याचा मुलांसाठी खेळणं म्हणून वापर केल्याचा परिणाम आपल्याला भोगावा लागतो.



विद्यार्थ्यांशी हितगुज
लक्ष्मण जगताप,
बारामती
संपर्क : ९४२३२ ४९९९६

मोबाईलपासून मुलांना वाचवायचे असेल तर छोट्या मुलांच्या हातात प्राणी, पक्षी, फुले, फळे, वाहने, घरातील वस्तू, विविध साधने यांची रंगीबेरंगी मोठी चित्रे असणारी पुस्तके द्या.

शाळेत जाणाऱ्या मुलांच्या हातात अक्षरांचा मोठा टाईप व चित्रे असणारी गोष्टीची पुस्तके द्या.मुले आवडीने पुस्तके वाचतील. मुलांना वाचनाचे व्यसन लागले तर त्याचे आयुष्य घडेल. परंतु लहानपणीच मोबाईलचे व्यसन लागले तर आयुष्य बिघडेल.

कारण पुस्तक वाचल्याने मस्तक घडते तर मोबाईलने बिघडू शकते.

आपण मुलांना कोणत्या सवयी लावतो हे सर्वस्वी पालक म्हणून आपल्यावर अवलंबून असते. मुले ही अनुकरणप्रिय असतात. आपल्या प्रत्येक गोष्टीवर त्यांचे लक्ष असते.

त्यासाठी मोबाईल हा अगदी गरजेपुरता आणि कामासाठीच थोडा वेळ वापरायचा.मगच तुम्ही मुलांना मोबाईलचे फायदे तोटे सांगू शकता.आणि त्यांना मोबाईलपासून वाचवू शकता.

कोणतीही गोष्ट चांगली किंवा वाईट नसते. आपण त्याचा कसा आणि किती वापर करतो यावर अवलंबून असते.




हे जनरल संपादक व प्रकाशक श्री.संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे–४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559